# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## परीपत्रक

**विषय :- आर्थिकदृष्टया कमकुवत महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेबाबत.**

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविल्या गेल्या. त्यापैकी एक महत्वाची योजना म्हणजे आर्थिकदृष्टया कमकुवत महाविद्यालयांना अर्थसहाय्य देण्याची योजना. सदर योजनेमध्ये विद्यापीठाशी संलग्नित विना अनुदानित / कायम विना अनुदानित कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचा विचार केला जाणार आहे.

कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना शासन अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही.तसेच सदरची महाविद्यालये पारंपारिक विद्याशाखांची (कला,वाणिज्य व विज्ञान) असतील तर त्यांना शुल्काचा माध्यमातून अत्यल्प अर्थसहाय्य प्राप्त होते. पर्यायाने सदरची महाविद्यालये इतर महाविद्यालयांच्या तुलनेत आर्थिकदृष्टया कमकुवत राहतात.

तसेच विद्यापीठाच्या कामकाजात होत असलेला संगणकीकरणाच्या वापर,भविष्यात त्यात होणारी प्रगती / विस्तार या बाबी विचारात घेवून सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाही संगणकाद्वारे विद्यापीठाशी जोडल्या जाणार आहेत.तथापि ब-याच कायम विनाअनुदानित पारंपारिक महाविद्यालयामध्ये संगणक,इंटरनेट,फॅक्स, झेरॉक्स मशिन अशा मुलभूत सुविधांचा अभाव आहे.

या बाबी अवलोकनी घेवून विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पारंपारिक विद्याशाखा कायम विना अनुदानित महाविद्यालयांना इतर महाविद्यालयाप्रमाणे सशक्त बनविण्यासाठी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून कमकुवत महाविद्यालयांना अर्थसहाय्य देण्याची योजना सुरु केली आहे.सदर योजनेचे निकष,कार्यपध्दती,अर्जाचा नमुना इ.बाबतची माहिती सोबत जोडली आहे.

**प्रस्तावाची अंतिम तारीख ३० सप्टेंबर,२०२२ पर्यत आहे. परंतू महाविद्यालयामधील प्रवेश प्रक्रिया आणि जुलै /ऑगस्ट मध्ये मोठया प्रमाणावर पाऊस असतो.त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी सदर योजनेमधून अर्थसहाय्य प्राप्त होण्यासाठी इच्छुक महाविद्यालयांना दि.३० सप्टेंबर,२०२२ पर्यत विहित नमुन्यात विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करता येईल.विलंबाने प्राप्त होणारे अर्ज अर्थसहाय्यासाठी अपात्र होतील.**

या योजनेअंतर्गत यापूर्वी अर्थसहाय्य प्राप्त झालेली महाविद्यालये सदर अर्थसहाय्यासाठी पुन्हा प्रस्ताव सादर करु शकतील.तथापि,सलग दुस-या वर्षी अर्थसहाय्य देताना,प्राधान्यक्रमाने प्रथम अर्थसहाय्यास पात्र होणा-या महाविद्यालयांना अर्थसहाय्य मंजुर करुन विद्यापीठाच्या शिल्लक तरतुदीनुसार प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल. ( सदर महाविद्यालयांनी यापूर्वी अर्थसहाय्य प्राप्त झाल्याने विद्यापीठाच्या पत्राची सांक्षकित प्रत व अर्थसहाय्याचा विनियोग अहवाल सोबत सादर करावा.)

प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन निकषानुसार पात्र महाविद्यालयांना तेथील विद्यार्थ्यांना सोयी - सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव,
( श्री.व्ही.एस. सोयम)
संलग्नता टी - २ विभाग
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

सोबत- वरीलप्रमाणे.
शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी दि ३० सप्टेंबर,२०२२ पर्यतच महाविद्यालयांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नुन्यातील प्रस्ताव सादर करावेत.
टिप: सदर परीपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर www.unidhivaji.ac.in - Affiliation - Affiliation T२ Circular -Scheme for Financially Weaker Colleges for the Academic Year २०२२-२३ या ठिकाणी उपलब्ध आहे.

संदर्भ क्रं. : संलग्नता/टी-२/ No 0 0 1 1 5

दिनांक : 0 5 AUG 2022

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित कायम विनाअनुदानित
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

Pen Drive/Weakar Sun&Circuler2021-22

**१. आर्थिकदृष्टया कमकुवत महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेचे निकष-**

१.कमकुवत महाविद्यालयांना द्यावयाच्या अर्थसहाय्यासाठी अर्ज करणारे महाविद्यालय कायम विनाअनुदानित /अंशत: विनाअनुदानित असावे.

२.महाविद्यालयाची स्थापना होऊन किमान तीन शैक्षणिक वर्षे एवढा कालावधी झालेला असणे आवश्यक आहे.

३.महाविद्यालयामध्ये कला/विज्ञान/ वाणिज्य यापैकी पारंपारिक विद्याशाखा सुरू असाव्यात.

४.ग्रामिण अथवा डोंगरी दुर्गम भागातील महाविद्यालयांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

५.महाविद्यालयाने विद्यापीठाच्या सर्व शुल्कांचा भरणा विहीत वेळेत केलेला असावा.(अग्रणी, अश्वमेध, प्रोरेटा, ई-सुविधा शुल्क, वार्षिक संलग्नीकरण शुल्क, तत्सम)

६.महाविद्यालय नॅक मुल्यांकित झाले असल्यास प्राध्यान्य द्यावे.

७.संलग्नीत अनुदानित/अंशत: अनुदानित महाविद्यालयातील ज्या विद्याशाखा/अभ्यासक्रम (B.A/B.Com/ B.Sc.) विनाअनुदानित आहेत त्या शाखा/ अभ्यासक्रम (B.A/B.Com/B.Sc.) या योजनेअंतर्गत अर्थसहाय्यास अर्ज करणेस पात्र ठरतील.

८. फक्त विहीत नमुन्यात व निर्धारित मुदतीत प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेण्यात येतील.

**२. अर्थसहाय्याचे स्वरूप-**

१.कमकुवत महाविद्यालयांना दिले जाणारे अर्थसहाय्य धनादेशाव्दारे आदा करण्यात येईल.

२.या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त झालेल्या महाविद्यालयास सलग दुसऱ्या वर्षी अर्थसहाय्य देताना, प्राधान्यक्रमाने प्रथम अर्थसहाय्यास पात्र होणाऱ्या महाविद्यालयांना अर्थसहाय्य मंजुर करून विद्यापीठाच्या शिल्लक आर्थिक तरतुदीनुसार प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल.

३.वाणिज्य विद्याशाखेसाठी रू १,००,०००/-,कला विद्याशाखेसाठी रू १,००,०००/- व विज्ञान विद्याशाखेसाठी रू १,५०,०००/- एवढे अर्थसहाय्य मंजुर करण्यात येईल.

**३. अर्थसहाय्याची कार्यपध्दती-**

१.कायम विनाअनुदानित /अंशत: विनाअनुदानित पारंपारिक विद्याशाखा असणाऱ्या महाविद्यालयांना सदर बाबतचे परिपत्रक प्रतिवर्षी जुलै महिन्यात पाठविण्यात यावे.

२.प्रतिवर्षी ३० सप्टेंबर,पर्यत महाविद्यालयांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहीत नमुन्यातील प्रस्ताव सादर करावेत. विलंबाने प्राप्त होणारे अर्ज अर्थसहाय्यासाठी अपात्र होतील.

३.प्रतिवर्षी विद्यापीठाची या योजनेसाठी तरतूद पाहून जास्तीत जास्त पात्र महाविद्यालयांना अर्थसहाय्य देण्यात येईल.

४.अर्थसहाय्य पात्र महाविद्यालयांनी अर्थसहाय्य रक्कमेची आगाऊ पोहोच पावती विद्यापीठास सादर करावी लागेल.

५. अर्थसहाय्यासाठी पात्र महाविद्यालयांना प्रतिवर्षी १५ ऑक्टोंबर पर्यंत धनादेश वितरीत करण्यात यावेत.

६. अर्थसहाय्य प्राप्त झालेल्या महाविद्यालयांनी संबंधीत शैक्षणिक वर्षामधील ३१ मार्च अखेर विद्यापीठाच्या लेखा विभागाकडून विनियोग प्रमाणपत्राचा विहीत नमुना घेवून विनियोग प्रमाणपत्र (Utilization Certificate) खर्चाच्या विशेष पत्रकासह एप्रिल महिन्यात विद्यापीठास सादर करणे बंधनकारक आहे.

७. सदर अर्थसहाय्यामधून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी संगणक व इंटरनेट सुविधा, ग्रंथालय पुस्तक पेढी, एलसीडी प्रोजेक्टर, फॅक्स मशीन, झेरॉक्स मशीन, लॅपटॉप, शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा उपकरणे, नकाशे अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

८. विद्यापीठातर्फे दिल्या जाणा-या अर्थसहाय्य रकमेचा विनीयोग हा पायाभूत संविधांवर व विद्यार्थी केंद्रीत बाबीवर करण्यात यावा.

९. संलग्नीकरणाच्या अटीची पूर्तता करण्यासाठी अर्थसहाय्य रकमेचा उपयोग होता कामा नये तसे आढळल्यास अर्थसहाय्य परत घेण्यात येईल.

१०. संबधित महाविद्यालयाने संलग्नीकरण्याच्या किमान अटींची पूर्तता केलेली असावी.

११. महाविद्यालयाने अनुदानाचा विनियोग योजनेतील तरतुदीप्रमाणे केला नाहीतर प्रपप्त अनुदान विद्यापीठास परत करावे लागेल.

१२. महाविद्यालयाने गतवर्षी मिळालेल्या अर्थसहाय्याचा विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारे फायदा झाला याचा सविस्तर अहवाल महाविद्यालयाने सादर करणे बंधनकारक आहे.

१३. विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या विविधच्या फीज (जिमखाना फी/ ग्रंथालय फी/ विकास निधी/ प्रयोगशाळा फी) त्या-त्या बाबींवर त्या-त्या वर्षात खर्च केलेल्या असाव्यात.

१४. महाविद्यालयाचे/संस्थेचे दरवर्षी रीतसर C.A.कडून ऑडिट झालेले असावे. (त्या वार्षिक पत्रकाच्या प्रती (Attested) अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.)

१५. महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य, आवश्यक तो पात्र शिक्षकवर्ग, ग्रंथपाल व शा.शि. संचालक नेमलेला असावा व त्या सर्वांना विद्यापीठाची मान्यता असावी.

१६. विद्यापीठातर्फे जितके अर्थसहाय्य दिले जाईल तितकाच हिस्सा महाविद्यालयाच्या पालक संस्थेने करणे आवश्यक आहे.

१७. अर्थसहाय्यासाठी महिला महाविद्यालयांचा प्राधान्याने विचार केला जाईल.

१८. अर्थसहाय्यासाठी महाविद्यालयाची निवड करताना जिल्हानिहाय समानतेचे तत्व विचारात घेतले जाईल.

१९. अर्थसहाय्याचा धनादेश प्राचार्यांच्या नावे देण्यात येईल. तो धनादेश विनावेतन बँक खात्यावर (Non- Salary Account) जमा करण्यात यावा.

२०. महाविद्यालयातील ज्या विद्याशाखेचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जातो, त्या विद्याशाखेचा गेल्या वर्षाचा सर्व वर्गांचा निकाल किमान ५०% असावा.

२१. महाविद्यालयाकडून विद्यापीठाच्या अथवा शासनाच्या कोणत्याही आदेशाचे/निर्देशाचे उल्लंघन केलेले नसावे, तसेच त्या महाविद्यालयावर विद्यापीठाने कोणतीही कारवाई केलेली नसावी.

२२. महाविद्यालयासंबंधी विद्यार्थ्यांच्या अथवा शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी विद्यापीठाकडे नसाव्यात.

२३. एकदा महाविद्यालयास अर्थसहाय्य केल्यानंतर पुढचे तीन वर्ष त्या संबंधित महाविद्यालयास अर्थसहाय्य मिळणार नाही.

४. **छाननी समिती-**

महाविद्यालयांकडून प्राप्त अर्जांची छाननी करण्यासाठी पुढीलप्रमाणे पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. कुलगुरू नामनिर्देशित संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| २ | मा. कुलगुरू नामनिर्देशित प्राचार्य प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | मा. कुलगुरू नामनिर्देशित शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | विद्यापीठाच्या विद्यार्थी मंडळाचे मा. सचिव | पदसिध्द सदस्य |
| ५ | संलग्नता टी- २ विभागाचे उपकुलसचिव | पदसिध्द सदस्य सचिव |

छाननी समितीचा कार्यकाल नियुक्ती दिनांकापासून तीन (०३) वर्षाचा राहील.

५. **प्रस्तावासोबत महाविद्यालयाने जोडावयाची कागदपत्रे-**

१. शासन व विद्यापीठ मान्यतेचे सुरवातीचे पत्र.

२. महाविद्यालयाने वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरलेली पावती, प्रोरेटा, लिड कॉलेज, आपत्कालीन निधी, अश्वमेध, विमा योजना इ. तत्सम बाबतची शुल्के भरलेल्या पावत्यांच्या छायांकीत प्रती व शुल्काची माहिती दर्शविणारा तक्ता.

३. महाविद्यालय डोंगरी, दुर्गम अथवा ग्रामिण भागात असल्यास सदरबाबतचा शासनाचा दाखला.

४. महाविद्यालयाने युवा महोत्सव, चर्चासत्र, क्रीडा, कार्यशाळा यामध्ये सहभाग घेतला असल्यास त्याबाबतची पुष्टी करणारी कागदपत्रे.

आर्थिकदृष्टया कमकुवत महाविद्यालय (Financially Weaker Colleges) योजनेअंतर्गत विद्यापीठ अर्थसहाय्यासाठी महाविद्यालयांनी सादर करावयाच्या अर्जाचा नमुना

---

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आर्थिकदृष्टया कमकुवत महाविद्यालय (Financially Weaker Colleges) योजनेअंतर्गत विद्यापीठ अर्थसहाय्यासाठी महाविद्यालयांनी सादर करावयाच्या अर्जाचा नमुना-

प्रति,

मा. कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१. संस्थेचे नाव -

२. संस्थेचे स्थापना वर्ष -

३. महाविद्यालयाचे नाव-

४. महाविद्यालयाचे स्थापना वर्ष -

५. प्राचार्यांचे नाव- प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक------------------

६. महाविद्यालयाचा दुरध्वनी क्रमांक - रजिस्ट्रार/कार्यालय अधीक्षक यांचा भ्रमणध्वनी -------

७. महाविद्यालयाची वेबसाईट व ई-मेल-

८. महाविद्यालयाचा संलग्नीकरणाचा प्रकार- निरंतर/ तात्पुरते

९. अनुदानाचा प्रकार - विना अनुदानित / कायम विनाअनुदानित / अशंत: अनुदानित (असल्यास अनुदानित विद्याशाखा नमुद करावी)-

१. महाविद्यालयात सुरू असलेले अभ्यासक्रम, प्रवेशित विद्यार्थी संख्या व निकाल याबाबतची माहिती

| अभ्यासक्रम | शैक्षणिक वर्ष | प्रवेशित विद्यार्थी संख्या (गत तीन वर्षातील) | | | निकालाची टक्केवारी (गत तीन वर्षातील) | | | विद्यार्थी प्राविण्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| बी.ए. | प्रथम वर्ष | | | | | | | |
| | व्दितीय वर्ष | | | | | | | |
| | तृतीय वर्ष | | | | | | | |
| बी.कॉम | प्रथम वर्ष | | | | | | | |
| | व्दितीय वर्ष | | | | | | | |
| | तृतीय वर्ष | | | | | | | |
| बी.एस्सी | प्रथम वर्ष | | | | | | | |
| | व्दितीय वर्ष | | | | | | | |
| | तृतीय वर्ष | | | | | | | |
| एम.ए. | प्रथम वर्ष | | | | | | | |
| | व्दितीय वर्ष | | | | | | | |
| एम.कॉम | प्रथम वर्ष | | | | | | | |
| | व्दितीय वर्ष | | | | | | | |
| एम.एस्सी | प्रथम वर्ष | | | | | | | |
| | व्दितीय वर्ष | | | | | | | |
| इतर | | | | | | | | |

२. महाविद्यालय डोंगराळ, दुर्गम अथवा ग्रामीण भागात आहे काय?(असल्यास शासनाचा दाखला जोडावा)

...५

३. महाविद्यालयात पुढीलपैकी कोणकोणत्या सोयीसुविधा आहेत-

| अ. क्र. | महाविद्यालयात असलेल्या सोयी सुविधा | आहेत/नाहीत |
|---|---|---|
| १. | ग्रंथालय | |
| २. | ग्रंथसंख्या (शाखावार संख्या नमुद करावी) | |
| ३. | अभ्यासिका | |
| ४. | जिमखाना | |
| ५. | कॅन्टीन | |
| ६. | विद्यार्थीनीसाठी खोली | |
| ७. | एन.एस.एस. व वर्गखोल्या | |
| ८. | प्रयोगशाळा | |
| ९. | खेळाचे मैदान | |
| १० | स्वच्छतागृहे | |
| ११ | इतर बाबी | |
| १२. | महाविद्यालयाने संलग्नीकरण शुल्क भरले आहे का? | सोबत तक्ता जोडला आहे |
| १३. | महाविद्यालयाने प्रोरेटा, लिड कॉलेज, आपत्कालीन निधी, अश्वमेध, विमा योजना इ. बाबतची शुल्के भरली आहेत का? | |

४.महाविद्यालयाचा युवा महोत्सव, चर्चासत्रे, क्रीडा, कार्यशाळा यामधील सहभाग(मागील तीन वर्षाच्या माहितीची कागदपत्रे तपशिल तक्त्यासह जोडली आहेत.)

५. कमकुवत महाविद्यालयांना दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्यांतर्गत आपल्या महाविद्यालयास पुढीलपैकी कोणत्या बाबींची प्रामुख्याने गरज आहे? (नावासमोर प्राधान्यक्रम दर्शवावा)

| अ.क्र. | साहित्य / सुविधांचा तपशील | प्राधान्यक्रम |
|---|---|---|
| १ | संगणक व इंटरनेट सुविधा | |
| २ | फोटोस्टॅट मशिन | |
| ३ | एलसीडी प्रोजेक्टर | |
| ४ | ग्रंथालय पुस्तक पेढी | |
| ५ | शैक्षणिक साहित्य | |
| ६ | इतर | |

आपला विश्वासू,

प्राचार्य
महाविद्यालयाचा शिक्का

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

### सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांनी अर्थसहाय्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांबाबत सादर कराव

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अनुदानाचा प्रकार (अनुदानित/ विनाअनुदानित) | महाविद्यालयाचे स्थापना वर्ष / महाविद्यालय स्थापना होवून तीन वर्ष झाली आहेत / नाहीत | महाविद्यालयात असलेल्या विद्याशाखा (पारंपारिक) | महाविद्यालय ग्रामिण / डोंगरी भागात आहे काय ? | विहीत शुल्क भरली आहेत का? विद्यापीठाकडे जमा केलेल्या सर्व शुल्काचा तपशील द्यावा. | विद्यापीठ परीक्षांमधील गत तीन वर्षातील यश (विद्याशाखा निहाय उत्तीर्ण टक्केवारी) | चर्चासत्रे परिषद इ. मधील शिक्षकांचा सहभाग | क्रिडा क्षेत्रातील यश | सांस्कृतिक क्षेत्रातील यश (युवक महोत्सव इ.) | उत्कृष्ट कार्य | गत वर्षाची प्रवेशित विद्यार्थी संख्या (भाग १+२+३) | महाविद्यालयांनी केलेली मागणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | कला<br>वाणिज्य<br>विज्ञान | | | | | कला<br>वाणिज्य<br>विज्ञान | |

प्राचार्यांची सही